जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय
क्र.कार्या-१०/कलि-नपाप्र/न.पं.निवड/ 337 /२०१६
दिनांक :-04 जुलै २०१६

# -: सुचना :-

(जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कडुन)

मा.राज्य निवडणूक आयोग , महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र-१०/का-६ दिनांक १५ जुन, २०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र नगर परीषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० (१) अन्वये मी, गडचिरोली जिल्हयांचा जिल्हाधिकारी, जिल्ह्यातील देसाईगंज नगर परिषदेच्या माहे डिसेंबर २०१६ मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नगर परिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल, त्या प्रभागांची संख्या व त्याची व्याप्ती आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचे मागास प्रवर्ग साठी जागा राखुन ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याचप्रमाणे त्यामधिल स्त्रियांसाठी जागा राखीव ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दीष्ट करण्याचे ठरवित आहे. याबाबतची अधिसुचना व आदेशाचा मसुदा जनतेच्या माहीतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच सर्व नगर परिषद, देसाईगंज व तहसिल कार्यालय, देसाईगंज सुचना फलकावर दिनांक ०५.०७.२०१६ (मंगळवार) रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

ही अधिसूचना गडचिरोली जिल्हयातील नगर परिषद, देसाईगंज क्षेत्रातील सर्व रहीवाश्यांच्या माहीतीकरीता प्रसिध्द करण्यात येत असुन आदेशाच्या मसुद्यावर दिनांक ०५.०७.२०१६ ते १४.०७.२०१६ पर्यंत कार्यालयीन वेळेत हरकती व सुचना मागविण्यात येत आहेत. उक्त आदेशाच्या मसुद्यास ज्या लोकांच्या काही हरकती/सुचना असतील त्यांनी त्या पुराव्यासह श्री.डी.जी.नान्हे, उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचेकडे दिनांक १४.०७.२०१६ रोजी किंवा तत्पुर्ती कार्यालयीन वेळेत लेखी सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती/सुचना विचारात घेण्यात येणार नाही.

विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर सुनावणी दिनांक २७.०७.२०१६ पर्यंत घेण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

टिप :- गडचिरोली जिल्हयातील नगर परिषद,देसाईगंज क्षेत्राच्या प्रभागाची सिमा दर्शविणारे नकाशे व व्याप्ती आणि व प्रभागाचे आरक्षण स्थिती पाहण्यासाठी नगर परिषद, देसाईगंज /तहसिल कार्यालय, देसाईगंज मध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील.

4/7/16

जिल्हाधिकारी गडचिरोली करीता